# चला लवकर लस घ्यायला!

**PREVENT GLOBAL HPV CANCERS**

**आजच आपल्या लेकीला लस दया व भविष्यात होणाऱ्या गर्भपिशवी मुखाच्या कर्करोगापासुन वाचवा.**



गर्भाशयमुखाचा कर्करोग प्रामुख्याने एच.पी. व्ही. जंतुच्या संसर्गामुळे होतो. एच. पी. व्ही. संसर्ग हे खूप सामान्य आहे. जवळपास **सर्वांनाच जिवनात कधीना-कधी** एच. पी. व्ही. संसर्ग होतो. आणि एच. पी. व्ही. लसीची मात्राच एच. पी. व्ही. संसर्ग रोखण्यास मदत करते व याच्यामुळेच गर्भपिशवीमुखाच्या कर्करोगास **प्रतिबंध** करता येतो.

## लसीकरणात वयाचे महत्व

प्रमाणित केलेल्या योग्य वयात एच. पी. व्ही. लस घेतल्यास लसीचा प्रभाव व संरक्षण जास्त मिळते.

**योग्य वय** ९-१४ वर्षे



**उशिरा/ जास्त मात्रा** १५ व त्यापुढील



डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार वयाच्या **९-१४ वर्षांत** HPV लस घेतल्यास भविष्यात होणाऱ्या गर्भपिशवी मुखाचा कर्करोग व ईतर ४ प्रकारच्या कर्क रोगांचा प्रतिबंध करता येतो.

## आजच आपली भेट निश्चित करा!



जर आपण आपल्या लेकीला १५ व्या वाढदिवसाच्या अगोदर एच. पी. व्ही. लसीची मात्रा दिल्यास गर्भपिशवीमुखाच्या कर्करोगा बरोबर इतर ४ कर्करोगापासून प्रतिबंध करता येते.

**एचपीव्ही लसीकरणाची तारीख:** ______________________________

# प्रश्न आणि उत्तर

PREVENT
GLOBAL
HPV CANCERS

### एचपीव्ही लसीकरण ९ - १४ वर्ष या वयातच करणे का आवश्यक आहे?

९-१४ या वयोगटात लसीकरणाचा प्रभाव सगळ्यात जास्त होतो व शरीराला सर्वात जास्त कर्करोगापासून संरक्षण मिळते. एचपीव्ही लसीकरणाच्या अभ्यासानुसार योग्य वयात (९-१४ वर्ष) केलेल्या लसीकरणाचा प्रभाव जास्त वयात केलेल्या लसीकरणाच्या तुलनेत अधिक प्रभावी असतो .

### माझ्या मुलीचे वय १४ वर्षा पेक्षा जास्त आहे तर आता मी काय करू शकते ?

एचपीव्ही लसीकरण १५व्या वाढदिवसा अगोदर केल्यास जास्त फायदेशीर असते. पण १५ पेक्षा पुढच्या वयात सुद्धा त्याची उपयुक्तता असते. १५ वर्ष व त्यापेक्षा अधिक वयाच्या मुलींना लसीकरणाचा तेवढाच फायदा आहे. फक्त लसीकरणाच्या २ ऐवजी ३ मात्रा लागतात.

### एचपीव्ही लसीकरणाचा शरीरावर काही दुष्परिणाम होतो का ?

एचपीव्ही लसीकरण पूर्णपणे सुरक्षित आहे. इतर लसी प्रमाणेच एचपीव्ही लसीकरणा नंतर हलकासा ताप, डोकेदुखी व इंजेक्शनच्या जागेवर लालसरपणा येऊ शकतो. फारच कमी मुलींना चक्कर येऊ शकते. त्यामुळे तुमच्या मुलींना लसीकरणा नंतर १५ मिनिट बसायला सांगतात .

## एचपीव्ही लसीची किंमत व ठिकाणाची माहिती यासाठी तुमच्या जवळील क्लिनिक किंवा दवाखान्याशी संपर्क करा

एचपीव्ही लसीकरण हे जागतिक पातळीवर प्रतिबंधक करण्यासाठी अमेरिकन कर्करोग सोसायटी हि एचपीव्ही कर्करोगासाठी जागतिक पातळीवर फ्री प्रोग्रामद्वारे सहयोगी उपक्रम करीत आहे.
शेवटचे संशोधन जानेवारी २०२४.